# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# केंद्र-राज्याच्या अनुदानावर महापालिकेचा भर

## उत्पन्न घटल्याने मोठी विकासकामे रखडली; केंद्र-राज्य योजनांचा निधी मिळवण्यासाठी महापालिका उभारणार स्वतंत्र यंत्रणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या डबघाईस आली आहे. त्यामुळे खर्चावर मर्यादा आल्या आहेत. मोठी विकासकामे निधीअभावी रखडली आहेत. त्यामुळे महापालिकेने आता केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळे विभाग, प्रकल्प, योजना, अभियान, उपक्रमात वितरीत केल्या जाणाऱ्या अनुदानाच्या निधीवर लक्ष केंद्रित केले आहे.



त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार असून, दरवर्षी किमान 500 कोटी रुपयांचा निधी जमा करण्याचे टार्गेट खासगी एजन्सीला देण्यात येणार आहे. महापालिकेचे सन 2026-27 या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प 5 हजार 660 कोटी 72 लाख रुपयांचा आहे. तर, केंद्र व राज्य शासनाचा निधी धरून अर्थसंकल्प एकूण 9 हजार 322 कोटी 17 लाख रुपयांचा आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षांत महापालिकेचे उत्पन्न 2 हजार 93 कोटी 12 लाख रुपयांनी घटले होते. महापालिकेने वर्षभरात 6 हजार 252 कोटी रुपयांचे टार्गेट ठेवले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ 4 हजार 158 कोटी 88 लाख रुपयाचे उत्पन्न वर्षभरात महापालिका तिजोरीत जमा झाले आहे. घटलेले उत्पन्न अणि पुढील चार वर्षाची देणी (दायित्व) लक्षात घेता महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे.

नवीन मोठे व खर्चिक प्रकल्प राबवण्यास महापालिकेकडे निधीची चणचण भासत आहे. त्यासाठी कर्ज तसेच, म्युन्सिपल बॉण्ड काढण्याचा पर्यायांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्याद्वारे निधी उभारून प्रकल्प राबवण्याची वेळ महापालिकेवर आली आहे. या आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी महापालिका प्रशासनाने केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे विविध प्रकाराचे अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून वेगवेगळे विभाग, प्रकल्प, योजना, अभियान, उपक्रमासाठी दरवर्षी अनुदान वितरीत केले जाते. त्यासाठी खासगी एजन्सी नेमण्यात येणार आहे. त्या एजन्सीला वर्षभरात 500 कोटी रुपयांचे अनुदान जमा करण्याचे टार्गेट असणार आहे. टार्गेट पूर्ण करणाऱ्या एजन्सीला हे काम दिले जाणार आहे. त्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका पूर्वी आर्थिक सक्षम होती. खर्चाचा सपाटा लावत, मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली गेली. विशेषत: प्रशासकीय राजवटीच्या चार वर्षाच्या काळात मोठ्या प्रमाणात उधळपट्टी करण्यात आली. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिकेच्या इतिहासात खर्चाचे अनेक विक्रम मोडले. नाहक उधळपट्टी थांबविण्याच्या लेखा व वित्त विभागाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत त्यांनी वारेमाप खर्चाचा सिलसिला कायम ठेवला. महापालिका आर्थिक सक्षम असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाकडे लक्ष दिले गेले नाही. त्यासाठी पाठपुरावाही केला गेला नाही. परिणामी, पाणीपुरवठा, पर्यावरण, ड्रेनेज, वैद्यकीय, शहरी दळणवळण, महिला बालकल्याण आदी विभागाचे अनुदान महापालिकेस प्राप्त झालेले नाही. आता, शासनाच्या अनुदानासाठी प्रशासन गंभीर झाले असून, तो निधी मिळविण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे.

### शासनाचे अनुदान मिळविण्यास प्राधान्य

» **अप्पूघरचे अत्याधुनिकीकरण पुढील १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पात डिजिटल तिकीट प्रणाली, स्मार्ट पार्किंग, आधुनिक फूड कोर्ट, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, अग्निसुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पर्यटकांचा अनुभव अधिक सुरक्षित, सुलभ आणि दर्जेदार करण्यावर भर दिला जाणार आहे. शहरातील सर्वांत जुने मनोरंजन उद्यान नव्या स्वरूपात विकसित होऊन पर्यटकांसाठी अधिक आकर्षक ठरण्याची अपेक्षा आहे.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये उघड्यावर स्क्रॅप वाहतूक; अपघाताचा धोका वाढला, कारवाईची मागणी

## ताडपत्री किंवा सुरक्षात्मक जाळीविना धातू भंगाराची वाहतूक सुरू; रस्ते सुरक्षा आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडच्या उद्योगनगरीत औद्योगिक भंगार व धातूचा कचरा उघड्यावर वाहून नेण्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. शहरातील प्रमुख रस्ते व उड्डाणपूल मार्गावर एका ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात धातूचे स्क्रॅप कोणतेही ताडपत्री किंवा सुरक्षात्मक जाळी न लावता वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.



अशा प्रकारच्या निष्काळजी वाहतुकीमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, अपघाताचा धोका वाढला आहे. औद्योगिक स्क्रॅप, लोखंडी तुकडे किंवा इतर भंगार साहित्य ट्रकमधून वाहतूक करताना ते व्यवस्थित झाकणे आणि सुरक्षितपणे बांधणे अपेक्षित असते.

मात्र अनेक वाहनांमध्ये हे नियम पाळले जात नसल्याचे दिसून येते. वाहन चालू असताना लहान-मोठे तुकडे रस्त्यावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मागून येणाऱ्या दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

याशिवाय उघड्यावर वाहतूक केल्यामुळे धूळ, कचरा आणि सूक्ष्म धातूचे कण हवेत पसरतात. याचा परिणाम पर्यावरणासह नागरिकांच्या आरोग्यावरही होऊ शकतो. शहरातील औद्योगिक क्षेत्रात अशा वाहनांची नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाचा कहर; रस्ते जलमय, वाहतूक ठप्प

## 24 तासांत 28.5 मिमी पावसाची नोंद; सखल भागात पाणी साचले, पीएमपी सेवा विस्कळीत, पूरस्थितीसाठी महापालिका यंत्रणा सज्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर परिसरात शुक्रवार (दि. ३१) सकाळपासूनच पावसाची बॅटिंग सुरू होती. पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. दिवसभराच्या जोरदार पावसाने रस्त्यावर आणि सखल भागात पाणीच पाणी केले होते. साचलेल्या पाण्यामुळे तसेच रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. शहरात गेल्या चोवीस तासांत २८.५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. जोरदार पावसामुळे उद्योगनगरीतील जनजीवन विस्कळीत झाले होते.

गुरुवारी रात्रीपासूनच पावसाला सुरुवात झाली होती. शुक्रवारी सकाळी मध्यम स्वरूपाच्या पावसानंतर दुपारी मुसळधार पावसाला सुरुवात झाली; मात्र सकाळी कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थ्यांना पावसात भिजतच जावे लागले. तसेच शाळा सुटतानादेखील विद्यार्थ्यांना भिजत घरी जावे लागले. सकाळी दूधवाले, पेपरवाले यांची पावसामुळे मोठी तारांबळ उडाल्याचे चित्र होते. भाजीविक्रेते आणि रस्त्यावरील विक्रेते यांच्या व्यवसायावर पावसामुळे परिणाम झाला.



### नियंत्रण कक्षाशी संपर्क साधा

» नागरिकांनीही हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे. पाणी साचलेल्या ठिकाणी जाणे, वेगाने वाहणारे पाणी ओलांडण्याचा प्रयत्न करणे, धोकादायक ठिकाणी गर्दी करणे टाळावे. कोणतीही आपत्कालीन घटना, झाड पडणे, पाणी साचणे किंवा इतर अडचण निर्माण झाल्यास महापालिकेच्या संबंधित विभागाशी किंवा नियंत्रण कक्षाशी तात्काळ संपर्क साधावा. कोणतीही आपत्कालीन मदत हवी असल्यास मुख्य नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०- ६७३३११११ किंवा ०२०- २८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दुपारी चारनंतरही पावसाचा जोर कायम होता. जोरदार पावसाने बाहेर पडलेल्या नागरिकांची फजिती झाली. पावसाचा जोर असल्याने थोड्याच वेळात शहरातील अनेक सखल भागात पाणी साचून तळ्याचे स्वरूप आले होते. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहने त्यातून नेताना बंद पडल्याने वाहतूककोंडी उद्भवली होती. पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, चोहीकडे खड्डेच खड्डे त्यामुळे वाहने चालवताना चालकांची मोठी कसरत होत आहे. निगडीतील टिळक चौक ते चिंचवड स्टेशनदरम्यान मेट्रोचे काम सुरू असल्याने बॅरिकेटिंगमुळे रस्ता अरुंद झाला आहे. त्यातच पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था होऊन वाहने चालविणे अवघड झाले होते. खरेदीसाठी बाहेर पडलेले नागरिक पावसामुळे अडकून पडले.

तर काही ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना घराच्या बाहेर पडता येईना, अशी परिस्थिती उद्भवली होती. तुंबलेल्या नाल्यामुळे पाण्याचा निचरा होण्याऐवजी पाणी रस्त्यावरुन ओढ्याप्रमाणे वाहत होते. या पाण्यातून वाट काढताना नागरिकांची मोठी फजिती होत असल्याचे दृश्य होते. पाऊस आणि कमालीचा गारठा यामुळे नागरिकांनी चहा, कॉफीसारखे गरम पेय घेण्यासाठी गाड्यांवर गर्दी झाली होती. पावसामुळे वडापाव, भजी यांना दिवसभर मागणी होती. बऱ्याच जणांचे कामानिमित्त व खरेदीसाठी बाहेर पडण्याचे बेत रद्द झाले. तर जोरदार पावसामुळे अनेकांनी घरात राहणे पसंत केले.

### बाजारपेठेतील वर्दळ रोडावली

» नेहमी गजबजलेल्या चिंचवड व पिंपरी बाजारपेठेतदेखील पावसामुळे नागरिकांची वर्दळ कमी होती. बसस्थानकावर बसची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना बसशेड अपुरे पडत होते. काही ठिकाणी बसथांब्याजवळ पाणी साचल्याने प्रवाशांना उभे रहायला जागा नव्हती. जवळ रेनकोट व छत्री नसलेले नागरिक दुकाने, पूल याठिकाणी आडोसा घेऊन ताटकळत उभे होते.

### या ठिकाणी साचले पाणी

» शहरातील निगडी, आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, भोसरी, कासारवाडी, दापोडी, तसेच मोशी, चिखली, शाहूनगर, मोरवाडी, वाल्हेकरवाडी, रहाटणी ठिकाणच्या सखल भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या. आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे पुलाखाली; तसेच संभाजीनगर, लिंकरोड येथील बलूनपार्क, दर्शनहॉल बसस्टॉपसमोरील रस्त्यावर पाणी पाणी झाले होते. आकुर्डी येथील मदर तेरेसा होम परिसरात मेहता हॉस्पिटल परिसर तसेच वाल्हेकरवाडी गुरुव्दारा चौक परिसरातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते.

# तळेगावच्या विकासाची 2035 पर्यंतची दूरदृष्टी; आमदार सुनील शेळके यांचा शाश्वत विकासाचा 'रोडमॅप'

## आमदार सुनील शेळके यांनी सहभाग घेत तळेगावच्या भविष्यातील शाश्वत, नागरिककेंद्रित आणि सर्वसमावेशक विकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या वतीने आयोजित 'तळेगाव स्मार्ट सिटी व्हिजन २०३५'या महत्त्वपूर्ण कार्यशाळा व चर्चासत्रात आमदार सुनील शेळके यांनी सहभाग घेत तळेगावच्या भविष्यातील शाश्वत, नागरिककेंद्रित आणि सर्वसमावेशक विकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तळेगावचा विकास केवळ आधुनिक इमारतींपुरता मर्यादित न राहता नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणारा, पर्यावरणपूरक आणि



नियोजनबद्ध असावा, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

यावेळी बोलताना आमदार शेळके म्हणाले की, तळेगाव हे शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि वाहतूक या सर्व क्षेत्रांत झपाट्याने विकसित होत आहे. त्यामुळे आगामी काळातील लोकसंख्या, औद्योगिक वाढ आणि नागरी गरजा लक्षात घेऊन शहराचा दीर्घकालीन विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. भविष्यातील तळेगाव अधिक सक्षम, सुबक आणि राहण्यायोग्य शहर म्हणून उभे राहावे, यासाठी आजच ठोस नियोजन करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शहराच्या विकासासाठी आंद्रा धरणातून बंदिस्त पाईपलाईनद्वारे स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा, एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्यांचे सक्षम जाळे, तळ्यापासून सुरू होणाऱ्या नाल्यालगत आकर्षक जॉगिंग ट्रॅक व पर्यटन विकास, मुख्य अंतर्गत रस्त्यांचे सुशोभीकरण, वाहतूक कोंडीमुक्ती, स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण, हरित क्षेत्रांची वाढ, डिजिटल सुविधा, तसेच स्थानिक रोजगारनिर्मिती या बाबींना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, उद्योजक आणि सर्व समाजघटकांच्या गरजा लक्षात घेऊन २०३५ चा विकास आराखडा तयार करण्यात येत असल्याचे नमूद करत, हा आराखडा तळेगावच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आमदार शेळके यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या सूचना आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून तयार होणारा हा आराखडा राज्यातील इतर नगरपालिकांसाठीही आदर्श ठरेल, असे त्यांनी सांगितले.

# अजित डोवाल यांच्यामुळेच देश अंतर्बाह्य सुरक्षित : गृहमंत्री अमित शहा


## राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांना 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय' पुरस्कार प्रदान

पुणे | प्रतिनिधी

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यामुळेच आज आपला देश अंतर्बाह्य सुरक्षित झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच त्यांची नियुक्ती केली. डोवाल यांनी इंटेलिजन्स ब्युरोच्या माध्यमातून देशासाठी योगदान दिले, असे गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले.

पुण्यातील टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. प्रणती टिळक, डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते.

अमित शहा म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी देशाला 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' हा बीजमंत्र दिला. स्वराज्य म्हणजे आपली भाषा, संस्कृती आणि धर्म होय. त्यांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या साजरे करण्याची प्रथा सुरू करून देशातील जनतेला जोडण्याचे काम करीत 'सांस्कृतिक राष्ट्रवाद'ची मुहूर्तमेढ रोवली. आज देश याच राष्ट्रवादावर चालत असून, त्याला कोणी मागे खेचू शकत नाही. पत्रकार किती निर्भीड असू शकतो, याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. इंग्रज केवळ 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्राला घाबरत होते. कोट्यवधी लोकांच्या मनात स्वराज्याची ज्योत त्यांनी पेटवली. संघटनेशिवाय राष्ट्रशक्ती उभारू शकत नाही, हे त्यांनी सांगितले. त्यांचा 'गीतारहस्य' हा ग्रंथ सर्व युवकांनी वाचावा. ते चुकीच्या रस्त्याने कधी जाणार नाहीत.




### एका चाणक्याने दुसऱ्या चाणक्याचा सन्मान केला

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अजित डोवाल हे देशाच्या सुरक्षेचे चाणक्य आहेत, तर गृहमंत्री अमित शहा हे राजकीय चाणक्य आहेत. त्यामुळे एका चाणक्याने दुसऱ्या चाणक्याचा यथोचित सन्मान केला आहे. भारत हा आता मार खाणारा देश राहिला नसून, शत्रूच्या घरात शिरून मारणारा देश झाला आहे. परखडपणे मत मांडणारे व्यक्तिमत्त्व डोवालच असून, त्यांनी कधी कोणत्या पुरस्काराची अपेक्षा केली नाही.

### शहा यांची डोवाल आणि मोदींवर स्तुतिसुमने

» कोणताही पुरस्कार हा लोकांना प्रेरणा देणारा, त्या व्यक्तीच्या कामाचा सन्मान करणारा असतो. डोवाल यांच्यासारख्या लोकांनी देशाला जीवन समर्पित केले. त्यांच्यासारख्या व्यक्तींना हा पुरस्कार देणे हा देशातील लोकांसाठी प्रेरणादायी आहे. मी गुजरातमध्ये गृहमंत्री असताना एकदा बॉम्बस्फोट झाल्यावर तत्कालिन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी मला या बॉम्बस्फोटाच्या घटनेचा तपास करण्यासाठी डोवाल यांना बोलावण्यास सांगितले. त्यानंतर गुजरातमधील १३ साखळी बॉम्बस्फोट उघडकीस आले होते, असे म्हणत शहा यांनी पंतप्रधान मोदी आणि डोवाल यांच्यावर स्तुतिसुमने उधळली.

### दोन धुरंधर एकत्र आले

» उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, देशाला स्वराज्याचा मंत्र देणाऱ्या लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीचा आजचा दिवस आहे. दहशतवाद्यांसाठी अजित डोवाल यांचे नावच पुरेसे आहे. देशाच्या सुरक्षेला नवीन दिशा देण्यासाठी रणनीती तयार करण्याचे काम ते करतात. देशाच्या इतिहासात पोलिस सेवेत कीर्तिचक्र एकमेव डोवाल यांनी मिळवले आहे. नवीन भारताचे खरे धुरंधर आणि जेम्स बॉंड डोवालच आहेत. पण, आता जेम्स बॉंड जुना झाला असून, त्यांना धुरंधरच म्हणणे योग्य राहील. अमित शहा यांनी देखील नक्षलवाद्यांचा खात्मा केल्याने त्यांना देखील धुरंधर म्हणणे योग्य राहील.

# पुणे महापालिकेच्या झाडणकामावर राजकीय दबाव? ठेकेदारांना नगरसेवकांच्या माणसांचा आग्रह

## नव्या स्वच्छता व्यवस्थेत 9 हजार 523 कर्मचारी रस्त्यावर; काम न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घेण्यास ठेकेदारांचा विरोध

पुणे | प्रतिनिधी

महापालिकेच्या रस्ते झाडणकामाच्या नव्या व्यवस्थेची अंमलबजावणी शनिवारपासून सुरू होत असतानाच काही नगरसेवकांकडून झाडणकामांसाठी आपलीच माणसे घ्यावीत, यासाठी ठेकेदारांवर दबाव आणला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. मात्र, नगरसेवकांची माणसे काम करत नसल्याने ठेकेदारांनी त्यास विरोध दर्शवला आहे.

ठेकेदारांकडून रस्त्यांवर प्रत्यक्ष झाडणकाम न करता केवळ कागदोपत्री काम झाल्याच्या तक्रारी महापालिकेकडे सातत्याने येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने झाडणकामाच्या पद्धतीत बदल केला आहे. आता केवळ कामगार पुरविण्याची जबाबदारी ठेकेदारांची राहणार नसून, त्यांना नेमून दिलेल्या परिसरातील रस्ते, चौक आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही त्यांच्यावर असेल. कामात त्रुटी आढळल्यास संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद केली आहे.

या नव्या व्यवस्थेसाठी महापालिकेने झाडणकामाचे मनुष्यबळ जवळपास दुप्पट केले आहे. यापूर्वी ४ हजार ८१६ कर्मचारी या कामासाठी कार्यरत होते. आता त्यात आणखी ४ हजार ७०९ कर्मचाऱ्यांची भर पडली आहे. त्यामुळे एकूण ९ हजार ५२३ कर्मचारी शहरातील रस्त्यांवर झाडणकाम करणार आहेत. वाढीव मनुष्यबळामुळे शहरातील स्वच्छतेत सुधारणा होईल, असा प्रशासनाचा दावा आहे. आपल्या वैयक्तिक कामांसाठी दोन-तीन कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी केल्याचेही सांगण्यात येत आहे. दरम्यान, नगरसेवकांच्या वशिल्याने भरती झालेले कर्मचारी काम नाहीत, आणि आता स्वच्छतेची थेट जबाबदारी ठेकेदारांवरच असल्याने ठेकेदारही नगरसेवकांची माणसे नको रे बाबा अशा भूमिकेत आहेत.



### महापौरांनी घेतली बैठक

» महापौर मंजूषा नागपुरे यांनी शुक्रवारी याबाबत बैठक घेतली. सभागृहनेते गणेश बिडकर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्यासह नगरसेवक आणि संबंधित अधिकारी बैठकीला उपस्थित होते. नवीन झाडणकामांबाबत नगरसेवकांच्या तक्रारी आणि अडचणी सोडवण्यासाठी प्रशासनाकडून पूर्ण सहकार्य केले जाईल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

# बारामतीतील 10 गावांचा होणार ‘स्मार्ट’ विकास

## संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेत सीओईपीच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन; एआय, ड्रोन, आयओटीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रामीण विकासात वापर

**पुणे | प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेअंतर्गत बारामती तालुक्यातील निवड झालेल्या १० गावांचा तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीने पुणे जिल्हा परिषद व सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती पंचायत समिती येथे जिल्हास्तरीय तांत्रिक मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गाव विकास आराखडे तयार करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यशाळेत काटेवाडी, मोरगाव, दोरलेवाडी, पणदरे, गुणवडी, वाणेवाडी, पिंपळी, सुपे, कारंजे आणि मुरूम या १० गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी गावांच्या गरजांचे वैज्ञानिक विश्लेषण (डीएनए सर्वेक्षण), जिल्हा तंत्रज्ञान सूची, तांत्रिक व्यवहार्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची प्रक्रिया, निधी नियोजन आणि विविध विभागांतील समन्वय याबाबत मार्गदर्शन केले. तसेच स्मार्ट शेती, पाणीपुरवठा, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, डिजिटल ग्रामपंचायत, ई-गव्हर्नन्स, आरोग्य, शिक्षण, पशुसंवर्धन, अक्षय ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), ड्रोन तंत्रज्ञान, स्काडा प्रणाली आणि टेलिमेडिसिनचा ग्रामीण विकासात वापर कसा करता येईल, याची माहितीही देण्यात आली.

यावेळी गजानन पाटील म्हणाले, 'संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजना ही केवळ विकासकामांची योजना नसून, लोकसहभाग, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास यांचा संगम आहे. प्रत्येक गावाच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन तंत्रज्ञानाधारित विकास आराखडे तयार करण्यात येतील. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि तांत्रिक संस्थांच्या समन्वयातून ही योजना प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे.'

### एआय, ड्रोन आणि आयओटीचा ग्रामविकासात वापर

» कार्यशाळेत सीओईपीच्या तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), ड्रोन तंत्रज्ञान, स्काडा प्रणाली, टेलिमेडिसिन, डिजिटल ग्रामपंचायत आणि ई-गव्हर्नन्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रामीण विकासात कसा उपयोग करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. याशिवाय स्मार्ट शेती, पाणीपुरवठा, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करून गावांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर देण्यात आला.

### तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामविकास

» संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेअंतर्गत बारामती तालुक्यातील निवड झालेल्या १० गावांचा तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत विकास करण्यात येणार आहे. पुणे जिल्हा परिषद आणि सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विकास आराखडे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्येक गावाच्या स्थानिक गरजांचा अभ्यास करून विज्ञानाधारित नियोजन करण्यात येणार असून, लोकसहभागातून विकासकामांना गती देण्याचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात आधुनिक सुविधा आणि प्रभावी प्रशासनाची उभारणी होण्यास मदत होणार आहे.

### सर्वेक्षणानंतर तयार होणार विकास आराखडे


» निवड झालेल्या दहा गावांमध्ये पुढील आठवड्यात ‘डायग्नोस्टिक नीड असेसमेंट’ (डीएनए) सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या आधारे प्रत्येक गावाच्या गरजा ओळखून तंत्रज्ञानाधारित विकास आराखडा तयार केला जाईल. त्यानंतर ग्रामसभेची मंजुरी, तांत्रिक व्यवहार्यता अभ्यास आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करून विविध विकासकामांची अंमलबजावणी सुरू होईल. हा उपक्रम बारामती तालुक्यातील गावे पर्यावरणपूरक, स्मार्ट आणि शाश्वत विकासाचे आदर्श मॉडेल बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# खडकवासला धरणातून 43 हजार क्युसेक विसर्ग; पुण्यात नदीकाठच्या भागांना पुराचा धोका कायम

## मुठा नदीची पाणीपातळी वाढली; 40 कुटुंबांतील 100 नागरिकांचे स्थलांतर, महापालिकेचा हायअलर्ट

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून शुक्रवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४३ हजार ५७१ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग केल्याने मुठा नदीकाठच्या नागरिकांना पुराचा फटका बसला. धरणसाखळीतील बहुतांश धरणे पूर्णक्षमतेच्या उंबरठ्यावर पोहचल्याने महापालिका आणि प्रशासनाने हायअलर्ट घोषित केला असून, वारजे तपोधाम, पाटील इस्टेट, पुलाची वाडी आणि रजपूतवस्ती या नदीकाठच्या भागांतील नागरिकांना विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन सिंहगड रस्ता परिसरातील चार सोसायट्यांमधील ४० कुटुंबांतील १०० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.



महापालिकेच्या आपत्ती नियंत्रण कक्षाच्या माहितीनुसार, सकाळी ८ ते सायंकाळी ५ या कालावधीत खडकवासला परिसरात ५६.६० मिमी पावसाची सर्वाधिक नोंद झाली. कोथरूड-बावधनमध्ये ४०.४० मिमी, वारजे-कर्वेनगरमध्ये ३८.४० मिमी, कसबा-विश्रामबागवाडा येथे ३७.४० मिमी, सिंहगड रस्ता परिसरात ३६ मिमी, तर भवानी पेठेत ३२.६० मिमी पाऊस झाला. शहरातील बहुतांश भागांत मध्यम ते जोरदार पावसाने हजेरी लावली.

धरणसाखळीतील पाणीसाठाही चिंताजनक पातळीवर पोहचला आहे. खडकवासला धरण १०० टक्के भरले असून, पानशेतमध्ये ९८.६८ टक्के, वरसगावमध्ये ९७.३१ टक्के, पवना ९९.७२ टक्के, तर मुळशी धरणात ८७.६२ टक्के पाणीसाठा आहे. पानशेतमधून १८,११५ क्युसेक, वरसगावमधून ५,२०० क्युसेक, पवना धरणातून ८,४०० क्युसेक आणि मुळशीतून ८,८०० क्युसेक विसर्ग सुरू असल्याने नदीपात्रातील पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. खडकवासला धरणातील ४३,५७१ क्युसेक विसर्ग कमी करून ३७,५९८ क्युसेक करण्यात आला आहे.

### 100 नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

» पूरस्थितीचा धोका लक्षात घेऊन सिंहगड रस्ता परिसरातील जलपूजन अपार्टमेंट, शारदा सोसायटी, द्वारका आणि आनंद पार्क येथील ४० कुटुंबांतील सुमारे १०० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. त्यांची व्यवस्था बॅडमिंटन हॉलमध्ये करण्यात आली आहे. शहरातील संभाव्य पूरबाधित ४९ ठिकाणी मदत केंद्रे सुरू करण्यात आली असून, गरज भासल्यास आणखी नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी निवारा केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत. सर्व विभागांना २४ तास सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.